## || आजोळ ||

आजोळ हा तर नेहमीचाच
जिव्हाळ्याचा विषय
पण आता तिथं कुणीच नाही
ना राहिली मायेची सय ||

आजी आजोबा मामा-मामी
मावशी-काका सगळेच होते सोबत
पण देव बाप्पाला पाहवले नाही
म्हणून राहिले प्रत्येकास बोलवत ||

लहानपणी सुट्ट्यांमध्ये
आजीकडे जायची तळमळ
तिच्या हातचे बनवलेले
चविष्ट पदार्थ खाण्याची चंगळ ||

आजोबा होते थोडे
गंभीर अन् शांत
कधीच नाही त्यांनी
पडू दिली कशाचीच भ्रांत ||

मामा मामीचा मिळाला नाही
कधीच इतका सहवास
आयुष्याच्या नात्यात गुरफटतानाच
करावा लागला त्यांना इहलोकीचा प्रवास ||

काका मावशीही सदा
तिथे यायचे वरचेवर
आम्हा सर्व भावंडांमध्ये
करायचे नाहीत फेवर ||

मे महिन्याच्या सुट्ट्यांमध्ये
असायचा एकच गलका
सगळे कितीही ओरडले तरी
आजी आजोबांना आम्हा नातवंडांचाच पुळका ||

आता मात्र आजोळीला
भकास झालेले पाहवत नाही
डोळ्यांना लागतात आपसुक धारा
पण तिथं जाण्याशिवाय मनाला मात्र राहवत नाही



निशिगंधा पवार
मुंबई

